## नियमित दिवाणी दावा क्र.१९९/२०१२ मधील नि. २७ खालील आदेश

प्रस्तुतचा दावा वादग्रस्त मिळकतींचे वाटप होवून कब्जा मिळणेसाठी व कायमस्वरुपी मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल करण्यात आला आहे.

२. प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रीया संहितेचे क्रम १ नियम १० अन्वये आवश्यक प्रतिवादी म्हणून अर्जातील नमूद इसमांना दाव्यात सामील करुन घेणेसंबंधी दाखल केला आहे. अर्जातील वादीचे थोडक्यात कथन असे आहे की, दावा दाखल करतेवेळी वादग्रस्त मिळकतीच्या सिटी सर्व्हे उता-यास सहहिश्येदार म्हणून अर्जातील नमूद इसमांची नांवे असल्याने, त्यांना आवश्यक पक्षकार म्हणून दाव्यात सामील करुन घेणे अनावधानाने राहून गेले होते. त्यामुळे अर्जातील नमूद श्री. सुर्यकांत आण्णाप्पा स्वामी रा. कुरुंदवाड , श्रीमती चंद्रबाई भ्र.बाबाजी बोरगांवे रा. कुरुंदवाड, श्री. मोरेश्वर रामचंद्र फाटक रा. कुरुंदवाड व श्री. महादेव आकाराम पाटील रा. कुरुंदवाड यांना अनुक्रमे प्रतिवादी क्र.३ ते ६ म्हणून दाव्यात समाविष्ट करण्याची परवानगी देण्यात यावी. त्यांना सामील करुन घेतल्यास दाव्याच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही अगर इतर प्रतिवादींचे त्यामुळे कसलेही नुकसान होणार नाही. प्रस्तुतचा दावा हा वाटपासाठी दाखल करण्यात आला असल्याने अर्जातील नमुद इसम हे आवश्यक पक्षकार आहेत. कायदेशीर गुंतागुंत टाळण्याच्या दृष्टीकोनातून अर्ज मंजूर करणे गरजेचे आहे. अर्ज नामंजूर करण्याने वादीचे पैशाने न भरुन येणारे नुकसान होणार आहे. इत्यादी सर्व बाबी नमुद करुन अर्ज मंजूर करणेची विनंती वादीने केली आहे.

३. प्रतिवादी क्र.१ व २ यांनी प्रस्तुत अर्जाकरीता आपले म्हणणे सादर केले असून त्यांचे थोडक्यात म्हणणे असे आहे की, अर्ज चुकीचा व बेकायदेशीर आहे. अर्जातील नमुद इसमांचा वादग्रस्त मिळकतींशी कोणताही संबंध नाही. अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. त्यामुळे अर्ज फेटाळण्यात यावा.

४. वादीतर्फे सुविद्य विधीज्ञ श्री.पी. आर. पाटील यांना वारंवार पुकारले असता ते गैरहजर आहेत. वादीतर्फे वारंवार संधी मिळुनही प्रस्तुत अर्जावर युक्तीवाद करण्यात आलेला नाही. त्यामुळे आज रोजी प्रस्तुतचा अर्ज वादीच्या युक्तीवादाशिवाय चालविण्यात येत आहे. प्रतिवादींतर्फे सुविद्य विधीज्ञ श्री.एम. एस. जाधव यांनी केलेला संपूर्ण युक्तीवाद ऐकला. वाद-प्रतिवाद कथनांचे अवलोकन केले.

५. संहितेचे क्रम १ नियम १० या तरतूदीचा वापर करण्यासाठी दोन प्रकारच्या अटींची पूर्तता व्हायला हवी. (१) दावा दाखल करताना खरोखरची चूक झाली

असली पाहीजे व (२) विरुध्द पक्षकारास मिळालेला मौल्यवान हक्क हिरावून घेता येणार नाही. विरुध्द पक्षकाराने हरकत घेतल्यावरही जर ती चूक तशीच राहीली तर ती 'खरोखरची ' चूक होत नाही. कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही पक्षकाराच्या अर्जावरुन किंवा तसा अर्ज आला नसतानाही आणि न्यायालयास न्याय्य वाटतील अशा अटींवर वादी म्हणून किंवा प्रतिवादी म्हणून अयोग्यपणे सामील करुन घेतलेल्या एखादया पक्षकाराचे नांव खोडून टाकण्यात यावे, आणि ज्या व्यक्तीला वादी म्हणून किंवा प्रतिवादी म्हणून सामील करुन घ्यावयास हवे होते किंवा दाव्यामध्ये गुंतलेल्या सर्व प्रश्नांचा परिणामकारकरीत्या व पूर्णपणे अधिनिर्णय करुन ते निकालात काढणे न्यायालयास शक्य होण्यासाठी ज्या व्यक्तींची न्यायालयासमोर हजेरी आवश्यक असेल अशा कोणत्याही व्यक्तीचे नांव जादा दाखल करण्यात यावे असा आदेश न्यायालयास देता येईल.

६. अभिलेखावरील सकृतदर्शनी कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले. वादग्रस्त घर मिळकत सि.स.क्र.५२४७ व ५१ या मिळकतीच्या उता-यांचे अवलोकन केले. पैकी सि. स क्र.४७ व सि. स. क्र.५१ या मिळकतींच्या ' भोगवटादाराचे नांव ' या सदरी अर्जातील नमुद इसमांच्या नांवांचा उल्लेख असल्याचे सकृतदर्शनी दिसते. दाव्यातील मुळ मागणी ही वादग्रस्त मिळकतींचे वाटप होवून त्यातील हिश्यांचा कब्जा मिळणेसाठी व कायमस्वरुपी मनाई हुकूम मिळणेसाठी असल्याचे दिसून येते. वादग्रस्त सि. स. क्र.५१ ही मिळकत सामाईक वहिवाटीची जाणे-येणे रस्त्याची मिळकत असल्याची विशिष्ट केस वादी घेवून आलेला आहे. प्रस्तुतचा दावा वाटपासाठी दाखल करण्यात आला असल्याने अर्जातील नमूद इसम हे प्रस्तुतकामातील योग्य पक्षकार (proper party) असल्याचे सकृतदर्शनी दिसते. अर्ज मंजूर करण्याने प्रतिवादी क्र.१ व २ यांचे काहीएक नुकसान होणार नाही. तथापि; अर्ज नामंजूर झाल्यास, दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय गुणवत्तेवर करणे दुरापास्त होणार आहे. त्यामुळे अर्जातील मागणीत तथ्य आढळते. परंतु, अर्ज दाखल करण्यास वादीने सुमारे दोन वर्षाचा विलंब केला आहे आणि त्यासाठीचे कोणतेही संयुक्तीक कारण अर्जात त्याने नमुद केलेले नाही. त्यामुळे अर्ज वादीवर रक्कम रु.३००/–इतका खर्च आकारुन मंजूर करणे उचित राहील. खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र.१ व २ यांना देवू करणे उचित राहील. करिता खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज वादीवर रक्कम रु.३००/–(रुपये तीनशे) फक्त इतका खर्च आकारुन मंजूर करण्यात येतो.

२.        वादीने प्रस्तुतचा आदेश झाल्यापासून १४(चौदा) दिवसांच्या कालावधीत अर्जातील नमुद ' श्री. सुर्यकांत आण्णाप्पा स्वामी, व.व.सज्ञान, धंदा नोकरी, रा. कुरुंदवाड , ता.शिरोळ, जि.कोल्हापूर, श्रीमती चंद्रबाई भ्र.बाबाजी बोरगांवे, व.व.३५, धंदा घरकाम, रा. सदर, श्री. मोरेश्वर रामचंद्र फाटक, व.व.६०, धंदा शेती, रा. सदर व श्री. महादेव आकाराम पाटील, व.व.६५, धंदा पेन्शनर, रा. सदर' यांना अनुक्रमे प्रतिवादी क्र.३ ते ६ म्हणून दाव्याच्या सरनाम्यात सामील करुन घ्यावे.

३.        खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र.१ व २ यांना वादीने अदा करावी.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

सही /-

दिनांक ५ नोव्हेंबर ,२०१५

( आर. आर. काळे)

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,

कुरुंदवाड.

I affirm that the contents of this P. D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | S.K.Yadav, Stenographer (L.G.) |
| Name of the Court | Civil Court Jr. Dn., Kurundwad. |
| Date of Dictation | 05.11.2015 |
| Order signed by the P. O. on | 05.11.2015 |
| Order uploaded on | 07.11.2015 |